

# भोग

मिलिंद कुलकर्णी

# भोग

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# भोग

## मिलींद सीताराम कुलकर्णी

## ई साहित्य प्रतिष्ठान

# भोग (कथासंग्रह)


## लेखक : मिलींद सीताराम कुलकर्णी

House No. A-14, Shri Vasunhara Gurubaksh Green colony,

Opp. Jaycees Public School, Near Shri Krishna Hospital,

Gangapur Road, Rudrapur

Distt. Udham Singh Nagar. Uttarakhand.

Phone no. 08171030307,

Email: milindslkulkarni@rediffmail. com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन :२५ मार्च २०१८



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.



मी मिलिंद सीताराम कुलकर्णी

जन्म तारीख : 25 मार्च 1972. शिक्षण: मेकॅनिकल इंजिनिअर. मूळ रहिवासी : कोल्हापूर. प्राथमिक/माध्यमिक शिक्षण : मराठी माध्यम. मातृभाषा: कन्नड (आई: विजापूर- कर्नाटक).

सध्या पुण्यात हेड-ऑफिस असणाऱ्या एका इंजिनीरिंग मॅनुफॅक्चरिंग कंपनीच्या पंत-नगर (रुद्रपूर) उत्तराखंड येथे असणाऱ्या शाखेमध्ये शाखा प्रमुख. त्यापूर्वी, जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगाव, पुणे येथे नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य.

“पुण्यातल्या एका इंजिनीरिंग कंपनीच्या पंत-नगर (रुद्रपूर) शाखेत शाखाप्रमुख म्हणून गेल्या पाच वर्षांपासून काम पाहतोय. मूळ कोल्हापूरचा. मातृभाषा कन्नड पण वडील महाराष्ट्र शासनामध्ये नोकरी करत असल्यामुळे शिक्षण मराठीत झाले. लहानपणापासून वाचनाची बऱ्यापैकी आवड होती. त्यातच लिखाणाची सवय लागली. वयाच्या विसाव्या वर्षांपासून लिहिण्यास सुरुवात केली होती. जयसिंगपूर, कोल्हापूर, पुणे, बेळगाव आणि आता रुद्रपूर इथे वेग-वेगळया कंपनीमध्ये नोकरी करता-करता, कामाच्या व्यापामुळे मध्यंतरी पंधरा-वीस वर्षे मनात असून सुद्धा लिहिणे शक्य झाले नाही. दोन-तीन वर्षांपूर्वी मीच पूर्वी लिहिलेल्या काही कथा वाचल्यानंतर पुन्हा मनात आले आणि लेखणी हातात घेतली. बघता-बघता बऱ्याच लघुकथा हातून लिहिल्या गेल्या. चित्रकलेची पण थोडीफार आवड आहे.

लिहिलेल्या कथा प्रकाशित कराव्यात असे मनात आले, मग एकच नाव आठवले “ई-साहित्य प्रकाशन”. त्यांच्या बहुमोल मदतीने हे माझे स्वप्न पूर्ण झाले. त्याबद्दल त्यांचे शतशः आभार. ”

# तिसऱ्या पुस्तकाच्या निमित्ताने

'काटा किर्रर्र' आणि 'भेटी लागी जीवा' नंतर माझे तिसरे पुस्तक !

माणसाच्या आयुष्यात बरेच प्रसंग येतात, काही चांगले काही वाईट. पण काही प्रसंग खोलवर परिणाम करणारे असतात, कदाचित आयुष्यही बदलून टाकणारे.

माझ्या या कथासंग्रहामधल्या चारही कथा अशाच आहेत, चरित्र-नायकाच्या अथवा नायिकेच्या आयुष्यात घडलेल्या घटनेमुळे त्यांच्या आयुष्याला वेगळीच भूमिका घ्यावी लागते किंवा कलाटणी मिळते.

अर्थात सर्व कथा काल्पनिक आहेत.


मी लिहिलेल्या या कथा वाचून आपले मनोगत स्पष्टपणे व्यक्त करणारे माझे दादा-वाहिनी, माझी पत्नी लता, आणि मुलगी प्रतिक्षा यांना मनापासून आभार.


आणि माझ्या तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या ई-साहित्यचे, आणि सुनील सामंत यांचे देखील मनापासून आभार.

पैसे काय हो येतात आणि जातात, पण आपण दिलेल्या प्रतिक्रिया, अभिप्राय हे अनंतकाळ टिकून असतात. यापूर्वीच्या कथासंग्रहाला मिळालेल्या आपणा वाचकांच्या प्रतिक्रियांच्या शिदोरीवरच माझे हे पुस्तक आपल्यासाठी सादर करतोय, अर्थात आपल्या प्रतिक्रियांच्या अपेक्षेत.

धन्यवाद.

मिलींद सीताराम कुलकर्णी.( 08171030307)


मिलींद कुलकर्णी
भेटी लागी जीवा


मिलींद कुलकर्णी
काटा किर्र

# अर्पण पत्रिका

म्हणतात ना,

आईने बनवलं, बाबांनी घडवलं,

आईने शब्द शिकविले, बाबांनी त्यांचा अर्थ समजावला.

त्याच शब्दांच्या समूहाने माझ्या हातून लिहिल्या गेलेल्या कथा,

माझ्या आई-बाबांना अर्पण !!!

*******

## कथानुक्रम

प्रवास

अजूनही.. .. . मी तुझीच आहे !!!

हॅलो मिस्टर अय्यर, हाऊ आर यु !!!

एवढे मी भोगिले की - - -!!!

# प्रवास

वातावरण ढगाळ असल्यामुळे अंधार पडल्यासारखे वाटत होते. मधेच वीज चमकत होती. थोड्याच वेळात पाऊस येण्याची चिन्हे दिसत होती. संध्याकाळचे सहा वाजून गेले तरी साडेचार वाजता येणारी बस आली नव्हती. जवळपास चार वाजण्याच्या आधी पासून बसची वाट बघत असलेला केदार घरी जाण्यासाठी आतुर झाला होता. केंव्हा एकदाची बस येते आणि घरी पोहोचतो असे त्याला झाले होते. त्याच्या समोर कितीतरी बसेस येवून जात होत्या, पण त्याला अपेक्षित असणारी बस येतच नव्हती. वैतागून तो घड्याळात पाहतो तर साडे सहा वाजत आलेले. खरं तर त्याला प्रवासाचा फार कंटाळा आला होता, पण घरचे सगळे भेटणार या आतुरतेसमोर सारे कष्ट सुसह्य होते.

कालच तर तो परदेशातून आला होता. कंपनीतून दहा दिवसांची सुट्टी घेवून आज घरी चालला होता. आज जवळ जवळ सहा महिन्यानंतर तो त्याच्या आई-वडिलांना, भावाला आणि मित्रांना भेटणार होता. खरं तर आणखी पंधरा दिवसांनी तो येणार होता, पण त्याचे ट्रेनिंग पंधरा दिवस अगोदरच संपलं आणि रिटर्नचं तिकीट पण लगेचच मिळालं. पंधरा दिवस अगोदरच येणार असल्याचे त्याने घरी कळवलेच नाही. कारण घरी अचानक जावून सर्वांना आश्चर्याचा धक्का द्यायचा होता. आणि म्हणून त्याला कधी एकदा घरी जातो अन सगळयांना आश्चर्यचकित

करतो असे झाले होते. केवळ पाऊण-एक तासाच्या प्रवासाठी त्याला जवळ जवळ दोन तासापेक्षा जास्त वाट पहावी लागत होती.

बऱ्याच प्रतीक्षेनंतर त्याची बस एकदाची आली, आणि तो बसकडे गेला. हमाला करवी सामान चढवून तो बसमध्ये बसला. बसमध्ये म्हणावी तशी गर्दी नव्हती. आधीच उशिरा आलेली बस लगेचच निघाली, तेंव्हा कुठे त्याचा उदासपणा कमी झाला, पण थकवा काही जात नव्हता. कसा जाणार, भरपूर लांबचा प्रवास झालेला आणि अगदी शेवटच्या टप्प्यातच बसला असा उशीर झालेला. तरीपण आता तो फक्त एका तासातच आपल्या घरी पोहोचणार होता. आपल्या आईला, अप्पाना आणि मंदारला भेटणार होता. ते पण पाच सहा महिन्यानंतर. जेव्हा तो दौऱ्यावर चालला होता तेव्हा त्याचा भाऊ मंदार तर हिरमुसलाच होता, मंदारच काय आईचे डोळे पण पाणावले होते. हळू हळू त्याचे मन भूतकाळात कधी शिरले ते त्याचं त्यालाच कळलं नाही.

खरंच, काळ सुद्धा किती भराभर सरकत असतो. कॉलेज मध्ये असताना तो याच रस्त्यावरून प्रवास करत असे. तेव्हा त्याच्या स्वप्नात सुद्धा आले नसेल की, याच रस्त्यावरून जावून; शिकून आपल्याला परदेशी जायला मिळेल. कॉलेज मध्येच झालेल्या मुलाखतीतून त्याला एका कंपनीतून नोकरीसाठी बोलावले गेले. शिक्षण पूर्ण होताच तो त्या कंपनीत नोकरी करू लागला. आणि दीड दोन वर्षातच कंपनीने त्याची उत्तम कामगिरी बघून त्याला परदेशी जाण्याची संधी दिली. त्याला जेव्हा कंपनीने सांगितले तेव्हा त्याला खरेच वाटले नाही. घरी जेव्हा ही वार्ता सांगितली

तेव्हा त्याच्या बोलण्यावर विश्वासच बसत नव्हता. पण जेव्हा त्याने कंपनीचे तसं पत्र दाखवलं तेव्हा खात्री पटली आणि सर्वांना इतका आनंद झाला की तो कोणीही लपवू शकले नाहीत.

केदारच्या परदेश दौऱ्याची बातमी शेजारी पाजारी सर्वांनी बघता बघता समजली. केदारचे वडील म्हणजे अप्पा तर आपले आनंदाश्रू पण लपवू शकले नाहीत. अप्पांनी आपले जिवलग मित्र दादुकाकांच्या पुढे ही बातमी सांगून, आपल्या घराण्यातून परदेशी जाण्याचे स्वप्न केदारने पूर्ण केल्याचे सांगितले. तेव्हा केदारला पण आपण घेतलेल्या कष्टाचे चीज झाल्याचे समाधान झाले. पेशाने शिक्षक असणारे अप्पा केदारच्या शिक्षणासाठी फार झटले होते. अर्थात केदारच्या मेहनतीची आणि हुशारीची साथ पण त्यांना तशीच मिळत होती. प्रत्येक वर्षी चांगले मार्क्स मिळवून तो इथपर्यंत पोहोचला होता. त्याचा लहान भाऊ मंदार तर ही बातमी ऐकून उड्याच मारू लागला. स्वत:च्या मित्रांना, शेजाऱ्यांना तो आनंदाने असे सांगत होता की जसा काही तो स्वत:च परदेशी जाणार आहे.

केदार परदेशी जाणार म्हणून त्याचे मित्रमंडळी, शेजारी त्याला चहा नाष्ट्याला, जेवायला बोलावत होते. तो पण जसे शक्य असेल तसे सर्वांना जावून भेटत होता आणि त्यांचे प्रेमाचे आमंत्रण स्वीकारत होता. पण एवढ्या सर्वांना आनंद झाला असला तरी त्याची आई मात्र उदास होती. कारण तिचा केदार अनोळख्या आणि दूरच्या देशात चालला होता आणि ते सुद्धा सहा महिन्यांसाठी. आपल्या पासून कधीही दूर न राहिलेल्या मुलाला ती परदेशी जाण्यास विरोधच करत होती, काय करायचे आहे ते आमच्या समोर आणि आपल्या देशात करू देत असे तिचे म्हणणे

होते. अर्थात त्यामागे तिची ममता आणि वात्सल्यच होते म्हणा. पण केदारचा उत्साह आणि अप्पा, दादुकाका, मंदार यांनी घातलेल्या समजुतीपुढे त्या माऊलीचा विरोध दुबळा ठरला.

परदेशी जाणार म्हणून उत्साही असणारा केदार उद्या जायचे आहे म्हटल्यावर कमालीचा अस्वस्थ दिसत होता. सकाळी आठच्या बसने निघून तो कंपनीत जाणार होता, तिथून संध्याकाळी मुंबईला आणि परवा सकाळी पुढचा प्रवास. आदल्या रात्री त्याला झोपच लागली नाही. परदेशी जाण्याच्या कुतूहलाबरोबरच सहा सात महिने आई, अप्पा आणि मंदार शिवाय राहायला लागणार हे त्याला जीवावर आले होते. त्याची बैग भरताना मदत करणाऱ्या मंदारला, दादाला काय आणायला सांगू आणि काय नको असे झाले होते. त्याची आणायच्या सामानाची यादी वाढतच होती, तर आईची इकडून नेण्याऱ्या सामानाची यादी वाढत होती. तिथले खाणे कसे असेल, हवामान कसे असेल, असे म्हणत ती त्याच्या बॅगेचा आकार वाढवतच होती.

सकाळी निघायची तयारी पूर्ण झाली. निघण्यापूर्वी आई अप्पा आणि दादुकाकांच्या पाया पडताना त्याला उचंबळून आले होते, पण अप्पांनी दिलेल्या धीरामुळे त्याने आवरते घेतले. आप्पांना पण दाटून आले होते, पण आपल्या भावना लपवून ते त्याला धीर देत होते. सहाच महिन्यांनी तो परत येणार होता पण ते सहा महिने केदार शिवाय घालविणे सर्वांना अवघड झाले होते. बस स्थानकावर त्याला

पाठवायला आई-अप्पा, मंदार सोबतच सर्व मित्रमंडळी पण आली होती, बस येईपर्यंत सार्वजण त्याला आपापल्या परीने सूचना आणि शुभेच्छा देत होते.

विजेच्या कडकडाटाने जेव्हा तो वर्तमानात आला तेव्हा बाहेर जोरात पाऊस पडत होता. तो किती वेळ असा भूतकाळात हरवून गेला होता त्यालाच कळत नव्हते, पण जेव्हा सध्य-स्थितीत आला तेव्हा विजांच्या कडकडात पाऊस पडत होता. आणि त्याची बस तर त्याच्या गावाजवळच आली होती. बघता बघता त्याचे उतरण्याचे ठिकाण पण आले. पाऊस भरपूर जोरात असल्यामुळे तो छोट्याशा शेड मध्येच थांबला. भरपूर पाऊस आणि लाईट गेल्यामुळे झालेला अंधार यामुळे त्या शेड मध्ये कोणच नव्हते. पावसाचा आणि मध्येच कडाडणाऱ्या विजांचा आवाज सोडल्यास तशी भयाण शांतताच पसरली होती. अशा वातावरणात त्याला तिथं थांबणं नको झालं, त्यात घरच्यांना भेटण्याची लागलेली ओढ. त्यामुळे तशा जोरदार पावसात सुद्धा भिजत घरी निघाला.

आपल्या दोन जड बगा गळयात अडकवून, दोन दोन्ही हातात पकडून तसाच पावसात भिजत घरी निघाला. पडणाऱ्या पावसाच्या आणि मध्येच कडाडणाऱ्या विजेच्या आवाजात त्याच्या पावलांनी चिखलात येण्याऱ्या छप-छप अशा आवाजाची सुद्धा आता भर पडली. आधीच घरी कळवले असते तर अप्पा, मंदार आणि कोणीतरी मित्र त्याला न्यायला आले असते पण त्याने कळवलंच नव्हतं,

कारण त्याला सगळयांना अनपेक्षित पणे भेटून आश्चर्यचकित करायचे होते. सगळयांना अचानक भेटल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव कसे असतील या विचारात त्याला आपल्याकडे असणाऱ्या ओझ्याचे भान देखील नव्हते. त्याला आतुरता होती ती फक्त आप्पांना, आईला आणि मंदारला भेटण्याची. पावसामुळे त्या अंधाऱ्या रस्त्यावर कोणीही नव्हते. सगळयांच्या घरांचे दरवाजे पण बंद होते, त्यामुळे कोणाची सोबत पण त्याला नव्हती. पण सोबत होती ती आपल्या घरचे सगळेजण आता काय करत असतील, कधी एकदा भेटणार या विचारांची. चालता चालता आता तर त्याला आपले घर काही अंतरावर दिसू लागले. थोडे पुढे गेल्यावर त्याला घरात लागलेला मिणमिणत्या दिव्याचा अंधुक प्रकाश पण दिसू लागला. लांबूनच मंदारला हाक मारून बोलवावे असे वाटले होते. पण स्वत:च्या मनाला त्याने आवर घातली.

जसा जसा तो घराजवळ जात होता तसं त्याला काही वेगळेच चित्र दिसू लागले. घरात आणि घराबाहेर माणसांची बरीच गर्दी जमली होती, विचित्र आवाज आणि गोंगाट ऐकू येत होता. त्याला समजेचना की नक्की काय चाललंय, म्हणून तो आणखी जोरात चालू लागला. इतक्या पावसातही जमलेल्या त्या गर्दीतून वाट काढत तो तसाच घरात घुसला. आणि पाहतो तर काय? घराच्या पहिल्याच खोलीत तीन व्यक्ती झोपल्या होत्या, आणि त्यांच्या अंगावर पांघरूण घातले होते. केदारची स्थिती विचित्र झाली होती, अनोळखी असल्यासारखे तो सगळयांच्या चेहऱ्याकडे तो बघत उभा राहिला. हातातल्या आणि गळयातल्या बॅगा त्याच्या नकळत खाली पडल्या.

त्या सुन्न अशा वातावरणात त्याला कोणीतरी ओळखले आणि त्यला घट्ट धरून त्याच्या पाठीवर थोपटत म्हणाले,"केदारा तुझी आई, अप्पा, मंदार सगळे सोडून गेले रे आपल्याला- - - - - -!"

"अरे असे काय बोलताय, आई अप्पा, मंदू तर झोपलेत, आणि तुम्ही सगळे त्यांच्या समोर अशी गर्दी करून काय थांबलात?"पावसात चिंब भिजलेला केदार स्वत:च्या तोंडावरचे पाणी हातानेच पुसत म्हणत होता,"थांबा मी आलोय ना आता ते उठतील, मी उठवतो त्यांना."

त्यांच्या जवळ जावून त्यांच्या तोंडावरच्या चादरी काढत त्यांना उठवू लागला,"आ - - ई, अ - - प्पा मी आलो, उठा उठा सगळे बघा इकडे कोण आलंय, मी आलोय मी केदार. आई आता गम्मत बास हं उठ बघू. आणि हा बघा मंदू, काय नाटक करतोय हुबेहूब झोपल्याचा, उठ रे! थांब तुझी गम्मत करतो मीच, मग कसा उठतोय बघा."असे म्हणत त्याने आपली एक बॅग ओढून उघडली आणि त्यातली एक एक वस्तू बाहेर काढू लागला,"हे बघा मी तुमच्यासाठी काय आणलंय, आई हे बघ, अप्पा ही तुमची शाल, आणि हे बघा घड्याळ मंदार साठी, तू उठलास तरच देणार हं - -! उठा की सगळेजण आतातरी; किती वेळ पडून राहणार, उठ की रे मंदार, अरे उठ की मंदार, मंदू, - - - - मंदू, मंद्या उठतोस की नाही, उठ उठ बघू - - !"असे म्हणत त्याचा शर्ट पकडून त्याला हलवू लागला, त्याला तोंडावर फाडफाड मारू लागला. त्या भयाण अंधारात सार्वजण स्तब्ध पणे उभे होते, त्याच्या जवळ जायचे धाडस कुणालाच होत नव्हते. सर्वजण बघत होते, हुंदके देत आणि रडत.

जो काही विपरीत प्रकार घडलाय हे तो स्वत:च समजून घेवून, आपले दु:ख व्यक्त करेल असे वाटून शेजारीच शांतपणे बघत बसलेले दादुकाका पुढे आले. त्याला घडलेला प्रकार सांगण्याचा प्रयत्न करत होते, पण त्याचे मन मानतच नव्हते, तो सगळे गम्मत करतायत असे समजून हसत होता, त्यांना उठवत होता.

हताशपणे त्याच्याकडे बघणाऱ्या दादुकाकानी त्याच्या थोबाडीत मारून घट्टपणे आपल्या छातीशी त्याला कवटाळले,"केदार, अरे बाळा ऐक तर, हे बघ माझे बोलणे तरी समजून घे."असे म्हणत त्याला घट्ट धरून आतल्या खोलीत घेवून चालले. पण हे लोक असे वेड्यासारखे का करताहेत हे केदारला समजतच नव्हते, 'आई, अप्पा, मंदार झोपलेत तर त्यांना उठवायचे सोडून उभे राहिलेत त्यांच्या भोवती गर्दी करून. आणि मी त्यांना उठवतोय यात काही चूक आहे का?' विचार असतानाच दादुकाकानी त्याला ओढतच आत नेले. आतल्या खोलीत बघतो तर त्याच्या छातीत धस्स झालं. कारण त्याच्या घराच्या छताला आणि भिंतीला भलं मोठ्ठ भगदाड पडले होते. त्यातूनच चमकणाऱ्या विजा दिसत होत्या, पावसाचे पाणी आत येत होते. चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशात त्याला, जमिनीवर मातीचा ढिगारा आणि चिखल साठलेला दिसत होता. सारं काही जळल्यासारखे दिसत होते.

स्तब्धपणे उभ्या असलेल्या केदारला डोळे पुसत दादुकाका म्हणत होते,"नियतीचा खेळच विचित्र असतो रे केदार, होत्याचं नव्हतं करायला वेळच लागत नाही त्याला. बाळा, तू जर अर्धा एक तास लवकर आला असतास तर कदाचित तुला - - - - - - - !". आपल्याला काय म्हणायचे आहे हेच दादुकाकाना कळत नव्हते, पुन्हा बोलू लागले,"अरे आकाशातली वीजच ती, जसं आपण तिचं

चमकणं बघण्या आधीच ती लुप्त होते, तसेच तुझ्या अप्पाचे, आईचे झाले रे, तो मंदार, अरे तो तर गेले चार दिवस तू पुढच्या आठवड्यात येणार म्हणून, - - - सगळेच आनंदात होते रे, पण त्यांना आनंद अनुभवण्याआधीच त्या आकाशातल्या विजेनं घात केला रे, हो त्या सर्वांना तिनं झोपवलय, ते न उठण्यासाठी, कधीच न उठण्यासाठी. सगळं संपलंय बाळ आता, तुलाच समजून घ्यावं लागेल, सगळं संपलंय."दादूकाका त्याच्या भिजलेल्या डोक्यावर हात फिरवत होते.

'मी आई-अप्पाना भेटण्या आधीच ते मला खरंच सोडून गेले, कसं शक्य आहे, दादुकाकाना कळतंच नाही. ते काही बोलतात, झोपलेत म्हणे न उठण्यासाठी, म्हणजे काय, अस होतं का कधीतरी, म्हणे न उठण्यासाठी सोडून गेले, बहुतेक त्यांना काही कळेनासं झालंय?, आई अप्पा मला सोडून जातीलच कसे, तो पण तो मंदार सोडून गेला म्हणजे काय? मला एकट्याने राहायचे, टाकून गेले सगळे. मग माझे कसे होणार? मी एकटाच कसं राहणार, म्हणे सोडून गेले, मग मी तरी काय करू एकटा राहून. एकटा म्हणे एकटा. ' तो दोन्ही हातानी डोके खाजवत विचार करत होता, इकडे तिकडे बघत विचित्रपणे होता. त्याचे डोळे अश्रुनी भरले होते पण तो रडत नव्हता, पावसात भिजलेल्या शरीरावर इकडे तिकडे हात फिरवत होता, खाजवत होता. त्याचे शरीर थरथर कापत होते. तसाच तो बाहेरच्या खोलीत आला आणि तिघांच्याही प्रेतांकडे बघत उभा राहीला.

आणि सर्वांच्याकडे बघून मधेच जोरात हसू लागला, हसता हसता दोन्ही हात डोक्यावर आपटून घेवू लागला. पुन्हा रडू लागला,"नाही नाही हे शक्यच नाही,

असं होते का कधी, मी एकटाच, मी नाही, मला सोडून ते गेले, झोपलेत कधीच उठणार नाहीत म्हणे, कसेही बोलतात ते सगळे, अप्पा, आई, मंदार गेले सगळे मला सोडून गेले. आई - - - अप्पा - - -”असा आक्रोश करत त्या गर्दीला ढकलून बाहेर चिखलातून पळत सुटला. बडबडत, हातवारे करत, कधी मोठ्याने हसत तर कधी रडत, भ्रमिष्टासारखा धावत होता. त्याला थांबवण्याची, अडवण्याची शक्ती कोणातच नव्हती, सर्वजण बघत होते, फक्त बघत होते. पाऊस अजूनही पडतच होता, मधेच वीज चमकत होती, आणि त्या चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशात त्याची हातवारे करत, दुरवर धावत निघालेली पाठमोरी आकृती सर्वांनाच दिसत होती- - - -!

त्याचा संपत आलेला प्रवास पुन्हा सुरु झाला होता, - - - - जणू न संपण्यासाठीच - - - - !!!

# अजूनही.. .. . मी तुझीच आहे !!!

---

**भ**रपूर प्रचंड इमारती, भयंकर गर्दी; माणसांची-वाहनांची आणि या सगळयांचा भयंकर कर्णकर्कश कोलाहल. त्या प्रचंड गर्दी आणि कोलाहलातून निघणारी ती अनोळखी वाट; अनोखा रस्ता. त्या वाटेने जसजसे पुढे जाऊ तसतसे विरळ होत गेलेली गर्दी वाहने आणि अर्थातच कमीकमी होत जाणारा कोलाहल. तिथूनही पुढे जाणारा तो शांत रस्ता, अनंताकडे जाणारा !

या रंगी-बेरंगी दुनियेत, प्रत्येकाच्या नजरेत आपापल्या मानसिकतेप्रमाणे निर-निराळया रंगातून जाणारा तो रस्ता, नंतर अरुंद आणि अंधुक वाट होत जाणारा तो शांत रस्ता !

कुणाला मुलायम गालिचासारखा गर्द-लाल, तर तोच कुणाला रक्तरंजित सडा-शिंपडल्यासारखा भडक तांबडा वाटणारा.

कुणाला निरभ्र आकाशासारखा शुभ्र-निळा, तर कुणाला छायेच्या खोल-गर्तेत घेऊन जाणारा जहरी-निळा वाटणारा.

कुणाला निसर्गसंपन्न कोवळा हरित, तर कुणाला विषवल्ली-युक्त जहरी हिरवा वाटणारा.

कुणाला सर्व-समावेशक कृष्णवर्णी, तर कुणाला कलंकित कुट्टकाळा वाटणारा.

कुणाला विद्वत्तेचे प्रतीक म्हणवणारा शुभ्र सफेद, तर कुणाला वैधव्याचे प्रतीक पांढरा-फटक वाटणारा !

स्वतःभोवती फिरणाऱ्या त्या वेगवेगळया रंगसंगतींच्या सुंदर छटांतून म्हणा किंवा स्वतःभोवती गोलगोल फिरणाऱ्या विविध रंगी भयानक रंग-लाटांच्यामधून, ते रंग-वलय अंधुक होऊन, त्यातून ती एक गडद वाट अंधुक होत चालली होती. रंगहीन होत चालली होती, जणू धुके पसरल्यासारखी. त्या धुक्यात विरत जाणाऱ्या आणि हळूहळू लुप्त होणाऱ्या त्या वाटेवरून तो चालला होता, अनंतात.

त्या धुक्यात, त्या वाटेप्रमाणे स्वतःसुद्धा लुप्त होत चालला होता !!!

******

चौदा फेब्रुवारी, म्हणजे व्हॅलेंटाईन डे. आपल्या प्रियावर प्रेम व्यक्त करण्याचा एक प्रेमळ आणि गुलाबी दिवस.

म्हणतात ना?,

“भरून आलेल्या ढगांमागून, जसा अचानक रविकिरण डोकावतो ।

तसाच काहीसा आवाज न-करता, आयुष्यात प्रेमाचा बहर येतो ॥”

गर्द-लाल रंगाच्या मुलायम गालीच्यावरुन येऊन तो तिच्या प्रेमाचा स्वीकार करणार होता, आजच्याच दिवशी. त्यांच्या एकमेकांवरच्या प्रेमाचे रूपांतर, नात्यात होणार होते,

पती-पत्नी या गोड नात्यात.

सकाळपासूनच तिच्या मनात एक धुक-धुक चालली होती, कुतूहलाची आणि आनंदाची. पाहुणेमंडळी येत होती, स्टेजवर पुरोहितांची मांडामांड सुरु होती, घरच्यांची धावपळ चालली होती. पण कुठल्याही कार्यक्रमात नेहमी पुढे-पुढे होऊन धावपळ करणारी ती, ती कधी नव्हे ते शांतपणे बसली होती. तिला तयार करणाऱ्या मैत्रिणींच्या घोळक्यात, त्यांच्या चेष्टा-मस्करी सहन करत बसली होती. कारण आज तीच उत्सवमूर्ती होती, तिचेच लग्न चालले होते.

“वऱ्हाड आले, पाहुणेमंडळी आली!”असे कुणीतरी म्हणताच तिच्या अंगावर शहारे आले. कारण तिच्या स्वप्नातला राजकुमार तिच्यापासून काही अंतरावर आला होता. तिचा कोमल हात हातात धरून, गर्द-लाल रंगाच्या मुलायम

गालीच्यावरुन तिला घेऊन जाण्यासाठी आपली अर्धांगी बनून. म्हणतात ना लग्न म्हणजे सात जन्माचे अतूट नाते, तेच तिच्या आयुष्यात बांधले जाणार होते,

त्याच्यासोबत !

******

निरभ्र अशा शुभ्र-निळया आकाशात मुक्त-विहार करणाऱ्या पक्ष्याप्रमाणे असणारे बालपण म्हणजे सुखाचा, मौज करण्याचा काळ. पण सृष्टिकर्त्याने आयुष्यात त्याचा अवधी इतका छोटासा ठेवलाय ना, बघता बघता संपून जातो. असे छोटेसे पण हसत-खेळत असणारे आपले बालपण आणि त्यातला अल्लडपणा कसा आणि कधी संपला हे तिला आणि तिच्या आई-बाबांना कळलेच नाही. मुळातच हुशार असणारी ती बघता-बघता कॉलेजला जाऊ लागली. एकुलती एक असल्यामुळे अर्थातच आई बाबांची खूपच लाडकी होती.

शुभ्र धवल यशाची चुणूक दाखवीत, स्वतःकडे असलेल्या विद्वत्तेनुसार तिने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. घराजवळच स्वतःचे एक क्लीनिक सुरु केले, काही दिवसातच ती एक चांगली डॉक्टर बनली. तिच्या मन-मिळावू स्वभावामुळे आणि आई-बाबांच्या ओळखीमुळे तिचे छोटेसे क्लिनिक व्यवस्थित चालू लागले. हळू हळू तिच्या कामाचा व्याप वाढला. अशीच चारपाच वर्षे निघून गेली.

आई-बाबांना तिच्या लग्नाची काळजी लागली, बरेच प्रयत्न करूनही तिचे लग्न जमतच नव्हते. धार्मिक असणारी तिची आई तिच्यासाठी देव-धर्म, उपास-नवस सर्व काही करत होती. तिच्या घरात आणि क्लीनिकमध्ये वास्तुदोष असून त्यामुळेच तिच्या लग्नासाठी अडचण येत असल्याचे तिच्या बाबांना कुणीतरी दाखवून दिले. तिच्यासारख्या डॉक्टरला असल्या सगळ्या गोष्टींवर विश्वास नव्हता पण आई-बाबांसाठी तिने घरी आणि क्लीनिकमध्ये बरेच बदल करवून घेतले.

कृष्ण वेड्या राधेला स्वतःत सामावून घेणारा काळा-सावळा माधव जसा भेटावा तसा तो तिला एके दिवशी भेटला. एका मेडिकल सेमिनारला ती जवळच्याच शहरात चार-पाच दिवसासाठी गेली होती, तेंव्हा तो डॉक्टर तिला भेटला. ओळख, फोनवर बोलणी, वारंवार होणारी भेट; या क्रमातून एकमेकात गुलाबी प्रेमाचा गुलाब कधी फुलला हे त्यांनाच कळले नाही. तिच्या आई-वडिलांच्या इच्छेनुसार नामांकित शास्त्रींना दोघांची पत्रिका दाखविली, त्यांच्या मताप्रमाणे ती सर्वोत्तम जुळली.

शास्त्रींनीं काढलेला मुहूर्त योगायोगाने आजचाच होता, म्हणजेच वॅलेंटाईन-डेचा !

******

कोपरापर्यंत मेंदीने रंगलेल्या तिच्या नाजूक हाताला चिमकुटा काढत तिच्या मैत्रिणी,

“काय डॉक्टरमॅडम, नवरदेवाची वरात बघायला आपल्याला सोडून थोड्यावेळासाठी आम्ही बाहेर गेलो, तर त्यांच्याच स्वप्नात गढून गेलात की काय?”असे म्हणताच ती एकदम भानावर आली.

निसर्गाने हिरव्या छटातून मुक्तहस्ते उधळलेला हरित-प्रदेश.

स्वतः हिरवी असणारी, पण तपकिरी रंगात आपला ठसा उठवणारी मेंदी. त्या तपकिरी मेंदीने रंगलेले आपले हात-पाय बघून ती स्वतःच लाजून चूर-चूर होत होती. त्यात खाली मान घालून लाजणाऱ्या तिचा हात त्याने हातात धरताच ती आणखीनच लाजली. एकमेकांचा हात हातात घेऊन भान हरपून ते आपल्याच जगात फिरत होते. सप्तरंगाची उधळण करणाऱ्या इंद्रधनूच्या वलयात बेभान होऊन फिरणाऱ्या त्या दोघांनाही खात्री होती, धरलेला हात आपला साथीदार कधीच सोडणार नाही, आयुष्यभर, नव्हे सात-जन्म.

लग्नानंतर फक्त तीन-चार दिवसांचा वेळ त्यांना फिरायला मिळाला. कारण दोघेही चांगले डॉक्टर असल्यामुळे क्लीनिक त्यांची वाट बघत होते. ती पण त्याच्यासोबत क्लीनिकला जाऊ लागली. काही दिवस आपल्या स्वतःच्या तर काही दिवस पतीच्या क्लीनिकमध्ये असे नियोजन तिने केले ज्यामुळे रुग्णांची यथोचित सेवा करू शकेल.

पंधरा-वीस दिवस भुर्कन जळून जाणाऱ्या कापरासारखे उडून गेले. पण त्या शुभ्र कापराचा सुगंध मात्र अजूनही मनात दरवळत होता. स्वतःच्या

क्लीनिकमधून ती लवकर आली होती. आपल्या सासू-सासऱ्यांसोबत गप्पा मारत, त्याची वाट बघत ती बसली होती. नेहमीपेक्षा त्याला यायला बराच वेळ लागला होता. कुणाचा तरी फोन आला म्हणून ती तिच्या सासऱ्यांसोबत निघाली. काही अंतर गेल्यावर तिला एक विचित्र भयानक दृश्य दिसले आणि तिचे मेंदीचे तपकिरी रंग न-उतरलेले हात-पाय लटपटायला लागले !

लाल रंगाच्या मुलायम गालीच्यावरुन तिचा हात धरून तिला घेऊन निघालेला तो, भयानक गडद तांबड्या रंगाच्या रक्त-सड्यावर पडलेला होता. निपचित, शांत आणि निष्प्राण होऊन. एका ट्रकच्या धडकेने स्वतःच्या दुचाकीवरून तो पडला होता. तिच्यासाठी जणू तो त्या रक्त-सड्यावरून दूर-दूर चालला होता तिचा हात सोडून. त्याला बघताच वडिलांनी तिला घट्ट धरले होते पण ती फक्त बघत होती, त्यांच्याकडे, त्याच्याकडे आणि, आणि नियतीकडे !

शुभ्र निळया आकाशात मुक्तपणे विहार करणाऱ्या पक्ष्याला जोडीदाराची साथ मिळताच आणखी उंच जाण्याची मनिषा होते. पण तो साथीदार मधेच सोडून गेल्यानंतर पंखातली ताकद हरलेला साथी जहरी-निळया खोल गर्तेत जाऊ लागल्याप्रमाणे तिला स्वतःविषयी जाणवू लागले. ही घटना घडून तीन-चार दिवस झाले तरी ती काहीच बोलली नव्हती, की रडली नव्हती. तिचे आई-वडील, सासू-सासरे तिला रडवायचा, वास्तवात आणायचा अतोनात प्रयत्न करत होते पण काहीच फरक पडत नव्हता. ती आपल्याच तंद्रीत शांतपणे बसून असायची.

पंधरा-वीस दिवसांच्या सहवासात सावळया कृष्णवेड्या राधेप्रमाणे ती सामावून गेली होती पण एकाच प्रसंगाने तिचे आयुष्य काळेकुट्ट झाले होते. ती

त्याच्या परत येण्याची आशा मनात घेऊन बसली होती, जी कधीच पूर्ण होणार नव्हती. पै-पाहुणे, मित्रमंडळी सर्वजण तिला भेटून जात होती, तिला समजावत होती. पण ती आपल्याच विचारात बसली होती गेलेले दिवस आठवत. ज्या हिरव्यागार वनराईत ती त्याचा हात हातात घेऊन फिरली होती ती तिला विषवल्लीनी भारलेली वाटू लागली. ज्या सातजन्माची स्वप्नं त्यांनी पहिली होती ती सात दिवसासाठी सुद्धा टिकली नव्हती.

भेटायाला येणारे कुणी तिच्याकडे सहानुभूतीने बघायचे, तर कुणी मनातल्या विचित्र विचाराने. पांढरे कपडे घालून बसलेल्या तिच्या सौभाग्य हरपलेल्या, पांढऱ्या झालेल्या कपाळाकडे सगळयांची नजर जात होती. एकवेळ तिच्या गोरेपणावर होणाऱ्या कौतुकाला, आज तिच्या वैधव्य आलेल्या पांढऱ्या-फटक रंगाने कलंकित म्हणत होते, तर कुणी तिच्या पुन्हा लग्नाविषयी चर्चित होते. शांतपणे बसलेल्या तिला कुणीतरी पांढऱ्या पायाची म्हणून कुजबुजल्याचे ऐकिवात आले आणि मन सुन्न झाले. आपलीच काहीतरी चूक असल्याची भावना तिच्या मनाशी, ऊन-सावली प्रमाणे काळया-पांढऱ्या रंगात लपंडाव खेळू लागल्या.

' नुकत्याच सुरुवात झालेल्या आपल्या नव्या आयुष्यातून तोच मला सोडून गेला तरी मीच गुन्हेगार, पण का? माझीच चूक आहे का? कुठे गेले ते वास्तूदोष निवारण, ती पत्रिका, ते मुहूर्त, ते पाहणारे तज्ज्ञ? सगळे काही दैवाने योग्यप्रकारे जुळवून आणले म्हणत होते ना?, हेच का जुळवून आणले ते?

अग्नीसमोर घेतलेल्या त्या सात जन्माच्या आणाभाका ह्याच का? हेच का ते सात फेरे? एवढेच आयुष्य माझ्यासोबत काढायचे होते, तर आलासच का माझ्या आयुष्यात? आता काय मी एकटे काढू राहिलेले आयुष्य ह्या पांढऱ्या कपाळाने, ह्या पांढऱ्या पायाने; कलंकित मनाने? तू माझा हात सोडून गेलास तरी मी तो सोडणार नाही. ' अशा नाना विचारांनी तिचे डोके भणभणत होते.

आज नववा दिवस, प्रत्येक जण आपापल्यापरीने थोडेफार सावरू लागले होते.

सकाळचे नऊ वाजून गेले तरी तिने आज खोलीचा दरवाजा उडालाच नव्हता. कधीही एवढा वेळ न-झोपणारी, थकल्यामुळे झोपली असेल म्हणून कुणीही तिला उठवायला गेले नाही. बारा वाजले तरी उठली नाही, म्हणून दरवाजा वाजवला तरी आतून काहीच प्रतिसाद नव्हता. मागच्या खिडकीतून तिला बोलावू म्हणून कोणीतरी गेले तर खिडकी बंद.

खिडकीच्या फटीतून बारीक डोळे करून बघितल्यानंतर त्या पाहणाऱ्याने जोरदार आवाजात हंबराडाच फोडला !

त्याला पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या, आणि पंख्याला लटकलेल्या तिचे पाय लोंबकळत असलेले दिसले !!!

ज्या धुक्यात विरत जाणाऱ्या आणि हळूहळू लुप्त होणाऱ्या त्या वाटेवरून तो निघून गेला होता, अनंतात लुप्त होऊन तिचा हात सोडून गेला होता.

आणि आता ती,

तुझ्या प्रेमाचा रंग तो.. .

अजूनही माझ्या मनात आहे. .. !

शेवटच्या क्षणापर्यंत मी.. ..

मी फक्त तुझीच आहे, तुझीच आहे.. .. .. .. !!

असे म्हणत त्याच वाटेवरून चालली होती, त्याला शोधत, त्याचा हात धरण्यासाठी त्या लुप्त होणाऱ्या वाटेवरून स्वतःही लुप्त होत चालली होती.

स्वतःवरचा कलंक इथेच ठेवून चालली होती !!!

§§§§§§

# हॅलो मिस्टर अय्यर, हाऊ आर यु !!!

"हॅलो, मिस्टर अय्यर, हाऊ आर यु, कसे आहेत? मजेत ना? काय चाललंय?"

जणू या प्रश्नाला उत्तर देत अय्यर फोनवर बोलू लागले. त्यांचा आवाज ऐकताच नुकतेच मंदिरातून परत आलेले, स्वयंपाक घरात काम करणारे आचारी भास्कर शेट्टी पटकन दारापाशी आले आणि पाहू लागले. तर जुन्या काळ्या फोनचा रिसिव्हर उचलून अय्यर कोणाशीतरी बोलत होते.

तब्येतीने मध्यम आणि उंच, काळेसावळे, करारी चेहरा. व्यवस्थित विंचरलेले, पांढरट-सोनेरी केस. भल्या मोठ्या कपाळावर इंग्रजी यु आकारातला ठसठशीत लावलेला पिवळसर गंध, त्याच्या मधोमध शेंदरी टिळा. डोळ्यांवर जाडजूड काड्यांचा चष्मा, गळयात तुळशी माळ. शुभ्र पांढऱ्या रंगाची जाड जरीकाठाची लुंगी नेसलेले, अंगात पांढरा शुभ्र सदरा, त्यावर फिकट केशरी रंगाची रेशमी शाल पांघरलेले अय्यर, डाव्या हाताने काळा रिसिव्हर कानाला लावून, उजव्या हाताने फोनच्या वाटोळया वायरशी खेळत, तल्लीन होऊन गप्पा मारत उभे होते.

रोज रात्री बरोबर आठ-सव्वाआठच्या सुमारास अय्यर फोनवर बोलायला लागायचे, साधारण दहा ते पंधरा मिनिटे बोलायचे. आचारी शेट्टी हे

स्वयंपाकघराच्या दरवाजाआडून पहात असत. गेले पंधरा-वीस दिवसांपासून त्यांना हा प्रकार पाहायला मिळत होता. फोन पासून स्वयंपाकघराचा दरवाजा खोलीच्या दुसऱ्या टोकाला असल्याने, आचारींना अय्यरांचे बोलणे ऐकू येत नसे. त्यामुळे अय्यर कुणाशी बोलतात काहीच कळत नसे. मंदिरातून नैवेद्य परत आला की ते फोनवर बोलायला लागायचे. पूर्वी अय्यर स्वतः मंदिरात नैवेद्य घेऊन जायचे, पण अक्का गेल्यापासून आजकाल ते काम आचारी शेट्टींच्यावरच आले होते.

व्यंकटेश्वरन नारायणन अय्यर, वयाची पंच्याहत्तरी पूर्ण झालेले. तरीपण शरीर एकदम ताठ, शरीराप्रमाणेच मनाने सुद्धा कणखर, बोलण्यात एक जरब. पण स्वभाव मात्र एकदम लाघवी आणि मन-मिळावू. मंदिरातले सेवेकरी, येणारे भक्त-मंडळी त्यांना गुरुजी म्हणूनच बोलवत असत.

********

वीसेक वर्षांपूर्वी, श्रीजानकीनायक मंदिराचा व्याप वाढत होता. शेजारच्या गावात राहून आपल्या शिक्षकी पेशातून वेळ काढून अय्यर दाम्पत्य मंदिरात नियमित येऊन सेवा करत होते. मंदिराच्या ट्रस्टींना पूर्णवेळ देखरेख पाहण्यासाठी कार्यकारी संचालकांची आवश्यकता होती. त्याविषयी एक दिवस ट्रस्टी मंडळाने अय्यरना विचारले, आणि अध्यात्माची आवड असणारे अय्यर दाम्पत्य यासाठी लगेचच तयार झाले. काही महिन्यानंतर दोघांनीही आपली नोकरी सोडून पूर्णवेळ मंदिराचा कारभार पाहू लागले.

काळया दगडातल्या, मुख्य कौलारू मंदिराच्या दगडी गाभाऱ्यात मधोमध धनुर्धारी श्रीजानकीनायक, डाव्या बाजूला जानकी, उजव्या हाताला धनुर्धारी लक्ष्मण यांच्या काळया पाषाणात कोरलेल्या रेखीव पुरातन मूर्ती. बाहेर उजव्या बाजूला श्रीविघ्नराजेंद्र म्हणजे श्रीगजाननाची, डाव्या बाजूला श्रीलक्ष्मी-विष्णूची मूर्ती, मंदिरासमोर एका छोट्याशा मंदिरात श्रीजानकीनायकाकडे हात जोडून पहात असलेली श्रीवज्रहनुमानाची अर्ध-वज्रासनातली बैठी मूर्ती. मंदिराचा परिसर तसा बराच मोठा होता.

राजे-महाराजे यांच्यापासून अनेक वेळा जीर्णोद्धार होत आलेल्या मंदिराची निगा चांगलीच ठेवली होती. मंदिराच्याच आवारात मागच्या बाजूला असणाऱ्या छोट्या-छोट्या खोल्यांच्यात काही सेवेकरी तिथेच राहून मंदिराची आजन्म सेवा करायचे. त्यांच्या शेजारी असणाऱ्या दोन खोल्यांच्या घरात राहून अय्यर दाम्पत्य देखील मंदिराचा कारभार पहायचे. त्यांच्या घरात असणाऱ्या स्वयंपाकघरातूनच देवाचा नैवेद्य बनायचा. म्हणजे आपल्या वडिलार्जित परंपरेनुसार आचारी भास्कर शेट्टी देवाचा आणि तेथील सेवेकऱ्यांचा स्वयंपाक सोवळयात बनवायचे. ते देखील मंदिराच्या आवारातच सेवेकऱ्यांसोबत त्या छोट्याश्या खोलीत रहायचे.

अय्यर दाम्पत्य आल्यापासून सर्व सेवेकऱ्यांनी एक वडिलधारा आधार मिळाला होता. सर्वजण अय्यरांना गुरुजी आणि अय्यरपत्नी जयलक्ष्मींना आक्का

म्हणून बोलायचे. ते दोघे देखील सर्वांशी प्रेमाने आणि आदरानेच बोलायचे. भास्कर शेट्टींना सर्वजण आचारी म्हणायचे. आचारींना स्वयंपाकात आक्कांची बरीच मदत मिळायची.

गुरुजी कधी-कधी हसत गमतीने,"आय एम ओल्ड मॅन, गुरुजी. बट माय जया इज टील यंग लेडी, ऑल आर कॉलिंग हर आक्का."(मी म्हातारा माणूस म्हणून गुरुजी. पण माझी जया अजूनही जणू तरुणीचं आहे म्हणून तिला सर्वजण आक्का म्हणतात. ) म्हणायचे.

त्या दोघांच्या मन-मिळावू आणि प्रेमळ स्वभावामुळे त्यांच्यासोबत वीसेक वर्षे कशी निघून गेली कळलीच नाहीत.

फोनवर बोलणाऱ्या गुरुजींकडे पहात आचारींना जुने दिवस आठवायचे.

गुरुजी आणि आक्का येण्यापूर्वीची मंदिराची अवस्था आणि ते इथे आल्यानंतर झालेला कायापालट आचारींच्या डोळयासमोर नेहमीच दिसायचा आणि जाणवायचा. पेशाने शिक्षक असणारे अय्यर दाम्पत्य जसे उच्च शिक्षित होते तसेच धार्मिकही होते. जरी ते धार्मिक असले तरी दोघेही अंधश्रद्ध बिलकुल नव्हते. जुन्या रीती, परंपरा यांना बगल देऊन काहीतरी नवीन करण्यात अय्यर गुरुजी माहीर होते. आणि ते सुद्धा ट्रस्टींच्या मनाविरुद्ध न-जाता.

शाळांच्या सुट्टीच्या काळात मंदिराच्या आवारात रामरक्षा, विष्णू-सहस्रनाम, रामायण, भगवदगीता, वेदांविषयी माहिती असे लहान मुलांसाठी अनेक कार्यक्रम असायचे. स्वतः गुरुजी, आक्का आणि तेथील जाणकार सेवेकरी, मुलांना वेगवेगळी माहिती द्यायचे, त्यात जाती-धर्माचा अजिबात भेद नसायचा.

रामनवमी, कृष्ण-जन्माष्टमी, हनुमानजयंती असे अनेक कार्यक्रम आक्का-गुरुजी आल्यापासून जोरात व्हायला लागले. अशा कार्यक्रमाला गावातले सर्व थरातले लोक सामील व्हायचे आणि आपापल्या परीने सेवा करायचे.

मंदिरात रोज येणारे झाडूवाले, सफाई कामगार यांना गुरुजी फारच मानायचे. त्यांना घरी बोलावून, आपल्या सोबत बसवून नाश्ता खाऊ घालायचे. आपल्यापेक्षा साफ-सफाई करणारे, सेवा करणारे यांच्यामुळेच खरे पावित्र्य निर्माण होते असे त्यांचे प्रामाणिक मत असायचे. आणि त्यामुळेच ते अशा लोकांना जवळ करायचे.

मंदिरातल्या सेवेकरी आणि कर्मचाऱ्यांसोबतच, मंदिरात येणाऱ्या भक्तांशी देखील त्यांचे चांगले संबंध असायचे. अगदी सामान्य लोकांपासून, अध्यापक, वकील, डॉक्टर उद्योगपती असे बरेच लोक नेहमी मंदिरात यायचे. त्यातच नेहमी संध्याकाळी वेळ मिळेल तसे येणारे कार्तिक रंगराजन नायडू देखील होते. गुरुजींपेक्षा वीसेक वर्षांनी लहान असणारे खाजकी कंपनी मध्ये नोकरी करायचे. नायडू जेंव्हा मंदिरात यायचे तेंव्हा गुरुजींना भेटूनच जायचे.

नायडूंच्या बोलक्या स्वभावामुळे अय्यर दाम्पत्यांची त्यांच्याशी चांगलीच मैत्री झाली. अय्यर आक्का-गुरुजी कधी कधी नायडूंच्या घरीसुद्धा जायचे. कोणताही विषय अगदी सहजतेने कसा सोडवायचा हे नायडू गुरुजींकडून शिकायचा प्रयत्न करायचे. एकमेकांच्या वयात तीनेक वर्षांचा अंतर असणारे गुरुजी आणि आक्का एकमेकांशी नेहमी आदरानेच बोलायचे. आपल्याला मुले नाहीत याची जाणीव देखील ते एकमेकांना होऊ देत नव्हते. पती-पत्नीच्या नात्यापेक्षा खेळीमेळीतले मैत्रीचेच नाते त्यांच्यात जाणवायचे

********

नायडू काही कामानिमित्त आठ-दहा दिवसासाठी बाहेरगावी गेले होते. जाण्यापूर्वी नायडू दाम्पत्य अर्थातच जानकीनायकाचे दर्शन घेऊन, गुरुजी आणि आक्कांना भेटून आले. नायडू जाऊन चार-पाच दिवस झाले असतील, एक दिवस रात्री आठ-साडेआठच्या सुमारास त्यांना आचारींचा फोन आला.

ते घाबरल्या आवाजात,”आक्कांची तब्बेत अचानक बिघडल्यामुळे त्यांना दवाखान्यात नेलंय. काही सेवेकरी भगिनी अक्कांसोबत दवाखान्यात थांबलेत. गुरुजी दवाखान्यातून येऊन जानकीनायकासमोर डोळे मिटून बसलेत, जवळ-जवळ दोन तास झाले. तुम्हाला शक्य असेल तर याल का?' असे विचारात होते.

“ओके, मी निघतो लगेचच, तुम्ही गुरुजींची आणि आक्कांची काळजी घ्या.”असे म्हणत नायडू निघायच्या तयारीला लागले.

सकाळी सहा-साडेसहा वाजता नायडू पोहोचले. घरी बॅग ठेवून तडक दवाखान्यात गेले. बरीच गर्दी जमली होती. नक्की काय झालंय काहीच कळत नव्हते. गुरुजी एकटेच डॉक्टरांच्या केबिनमध्ये काहीतरी लिहीत बसले होते. तो कागद डॉक्टरांच्याकडे देऊन ते काही वेळातच बाहेर आले.

रात्रभर झालेल्या जागरणामुळे आलेला चेहऱ्यावरचा थकवा लपवत नायडूंकडे पहात गुरुजी,"हॅलो मिस्टर नायडू, तुम्ही कधी आलात?"

"आत्ताच आलो गुरुजी. आक्का कशा आहेत?"नायडू.

"चला माझ्यासोबत, तिकडेच जाऊया आपण !!"असे म्हणत नायडूंच्या खांद्यावर हात ठेवत, त्यांना घेऊन ते भर-भर निघाले. सोबत असणारे इतर लोकही निघाले.

वरच्या मजल्यावर असणाऱ्या एका रूममध्ये गेले.

त्या रूममधल्या काचेच्या दरवाज्यापलीकडे स्ट्रेचरवर; नाकात कापसाचे बोळे कोंबलेल्या, पांढऱ्या वस्त्रात लपेटलेल्या आक्कांना झोपवले होते. नायडूंना ते बघताच एकदम धस्स झाले.

"प्लिज कीप क्वायेट, सर्वांनी शांत राहा, आणि जयाचे अंतिम दर्शन घ्या.

ओन्ली थर्टी मिनिट्स विथ अस, अर्ध्या तासांनी ते तिला पुढच्या प्रवासासाठी घेऊन जाणार आहेत. आम्ही दोघांनी ठरवल्यानुसार देह-दान केलंय तिचं. डोनेटेड हर बॉडी !!”

सर्वांकडे पहात हात जोडून, गंभीर चेहऱ्याने, थंड डोक्याने आणि शांत आवाजात गुरुजी बोलत होते.

सारे वातावरण शांत आणि गंभीर झाले.

“आय टोल्ड आचारी, टू गो टेम्पल. मी आचारींना मंदिरात नित्यपूजा करण्यासाठी पाठवलंय, काही वेळेपूर्वीच आचारी आणि सेवेकरी जयाचं अंत्यदर्शन घेऊन गेलेत !”बराच वेळ शांत असणाऱ्या वातावरणाला चिरत गुरुजी नायडूंना सांगत होते, स्तब्ध होऊन नायडू फक्त ऐकत होते. अर्ध्या-पाऊण तासांनी सर्वांना बाहेर जाण्यास सांगून, त्या काचेच्या दरवाज्यावर पांढराशुभ्र पडदा सरकवून, त्या रूमचा दरवाजा बंद करण्यात आला.

आणि गुरुजी, नायडू आक्कांचे अंतिम दर्शन घेऊन इतर लोकांसोबत जड पावलांनी परत निघाले.

दिवस पूर्ण होईस्तोवर, आपण मंदिराच्या आवारात न-येता मंदिराबाहेर यात्रींसाठी बांधलेल्या एका खोलीमध्ये राहणार असल्याचा निर्णय

गुरुजींनी सर्वांना सांगितला. त्यानुसार सगळेजण तेथेच गेले. गुरुजींचा हा खंबीरपणा पाहून नायडू चकित होऊन भरल्या डोळ्यांनी गुरुजींकडे पाहात होते.

ते लक्षात आल्यामुळे असेल कदाचित, गुरुजी नायडूंच्या खांद्यावर हात ठेवत बोलून गेले,

“माय जया इज वेल मॅनेजर फॉर माय लाईफ. जया माझ्या जीवनाची उत्तम मॅनेजर आहे. ती जरी गेली असली तरी तिचं पूर्ण लक्ष आहे माझ्यावर. म्हणतात ना, अंतिम क्षणी शरीरापासून आत्मा वेगळा होतो. हार्ट फेल होणे, चक्कर येणे, आजारी पडणे हे फक्त कारण आहे. ओन्ली रिजन.

सो शी इज ऑल्वेज विथ मी !!!”

गुरुजी भेटायला आलेल्या प्रत्येकाला सांगायचे,

“नो फोटो, नो फ्लॉवर्स. जयाचा फोटो अजिबात लावू नका. फुले-हार-बुके काही आणू नका. बिकॉज शी इस सिम्पल, आपल्यासारखीच साधी आणि सामान्य आहे. आपल्या मनात साठवून ठेवूया, तिचं अस्तित्व सदैव माझ्यासोबत राहील अशी प्रार्थना करा. सो प्लिज प्रे ओन्ली.”

काही दिवसानंतर गुरुजी पुन्हा मंदिरात येऊ लागले. सकाळची पूजा स्वतः करत, दुपारची-संध्याकाळची आरती-नैवेद्य आचारींना आणि निवडक सेवेकऱ्यांना करायला सांगत. त्या सेवेकऱ्यांमध्ये जणू आपला उत्तराधिकारी तयार करत होते.

दिवसातला बराच काळ ते एकांतात घालवत असत, कधी आपल्या खोलीमध्ये, कधी जानकीनायकासमोर, कधी विघ्नराजेंद्रासमोर, तर कधी लक्ष्मी-विष्णुसमोर एकांतात ध्यानस्थ बसायचे. संध्याकाळी येणारे भक्त त्यांच्याशी बोलण्यासाठी त्यांना शोधत यायचे, आणि गुरूजीसुद्धा मंदिराच्या आवारात भक्तांशी गप्पा मारत बसायचे, त्यांचा असा नित्यक्रमच सुरु झाला. नायडूदेखील रोजच संध्याकाळी मंदिरात येऊन गुरुजींशी बोलत बसू लागले.

एक दिवस गुरुजी गप्पा मारत बसले होते, सोबत नायडू एकटेच होते.

अचानक गुरुजींना काहीतरी आठवले, आणि नायडूंचा हात हातात धरून म्हणाले, -

“मिस्टर नायडू, लास्ट नाईट माय जया केम इन ड्रीम. रात्री माझी जया माझ्या स्वप्नात आली होती, अँड आस्क्ड मी. मिस्टर अय्यर हाऊ आर यु? मला मिस्टर अय्यर कसे आहात? म्हणून विचारत होती.”

चेहऱ्यावर लहान मुलांसारखे भाव आणून गुरुजी आनंदाने सांगू लागले, -

“तुम्ही सर्वांनी दाखवलेल्या आपुलकीबद्दल तुम्हा सर्वांना ती थँक्स सांगत होती.

मलापण थँक्स म्हणाली ती, कारण ती सांगितल्याप्रमाणे मी वागलो आणि वागतोय ना!

आय प्रॉमिस्ड हर, तिला तसे वाचन दिले होते, ती गेल्यावर मी खंबीर राहीन म्हणून.

पन्नास वर्षे होऊन गेली आमच्या लग्नाला, एकमेकांचे शब्द आम्ही कधीच मोडत नाही.

ऑफकोर्स, ती सुद्धा माझे शब्द कधीच मोडणार नाही. शी प्रॉमिस्ड मी.”

*****

त्या दिवशी दुपारी गुरुजी, नायडूंच्या घरी गेले होते. संध्याकाळी आरतीची वेळ होताच नायडूंसोबतच मंदिरात आले. आरती झाली, आचारींनी नैवेद्य दाखविला. रात्रीचे आठ वाजत आले. आणि गुरुजी अचानक जवळपास धावतच आपल्या खोलीकडे निघाले. नायडूही त्यांच्या पाठीमागे चालले,

तर त्यांच्याकडे पाहून हात करत,”मिस्टर नायडू, जस्ट आय विल कम. मी येतो थोड्याच वेळात. थांबा तिथेच.”असे म्हणत ते खोलीत गेले.

नैवेद्य परत स्वयंपाकघरात ठेवून, आचारी शेट्टी नायडूंजवळ आले,”नायडुजी, गुरुजी यावेळी कोणाशी तरी फोनवर बोलतात, लँडलाईन वरून, रोजच. मी हे गेले पंधरा दिवस झाले पहातोय.”

“पण आचारी, आपल्या मंदिराचा लँडलाईन फोन तर गेल्या काही दिवसापासून बंद आहे ना? आय मिन डेड झालाय ना?”नायडूंना अचानक आठवले आणि बोलून गेले.

आणि दोघेही प्रश्नार्थक नजरेने एकमेकांकडे पाहू लागले !!!

गुरुजींच्या नकळत दोघेही खोलीजवळ गेले आणि दरवाज्याच्या आडून पाहू लागले.

गुरुजींचा आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता. रिसिव्हर कानाला लावून शांतपणे,

“आय एम फाईन, तू कशी आहेस जया?”उजव्या हाताने फोनच्या वाटोळया वायरशी खेळत गुरुजी बोलत होते.

“आज नायडूंच्या घरी गेलो होतो, तिथे पण मन लागत नव्हते. सगळयांच्या समोर धीराने वागतोय, मन रमवल्यासारखे दाखवतो, आणि आलेला दिवस कसा संपेल ह्याची वाट पहात असतो.

कधी एकदाचे रात्रीचे आठ वाजतात आणि तुझ्याशी बोलतोय असे होते.

बरं माझे काम केलंस का तू? कधी बोलावतायत म्हणे मला? विचारून सांग ना?

युप्रॉमिस्ड मी, वचन दिलंस तसं तू मला, सोडून जाताना, आठवतंय ना?

आचारी स्वयंपाकाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडतायत, इथली काही मुले पण पूजेला, आरतीला तयार झालीत. सगळी जबाबदारी पण त्यांच्यावर सोपवतोय. आतातरी इथले कार्य संपवून मला तिकडे येऊ दे ना !

जो पर्यंत तू मला बोलावून घेत नाहीस, तोपर्यंत मी रोजच असा त्रास देणार.

अंडरस्टॅंड !!!”

इतके धीरोदात्त आणि संयमी असणारे गुरुजी खरोखरच किती हळवे झाले होते.

गुरुजींचे बोलणे ऐकून, आचारी शेट्टी आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून, अश्रूंना वाट मोकळी करून देत पटकन खाली बसले.

आणि नायडू, आलेला हुंदका आवरत, डोळयातून वाहणाऱ्या अश्रूंच्या धारा हातातल्या रुमालाने थोपवण्याचा प्रयत्न करत, तिथून बाहेर पडले !!!!!

§§§§§§

# एवढे मी भोगिले की - - -!!!

**संध्याकाळी** सहा-सातची वेळ, नुकतीच एप्रिल महिन्याची सुरुवात झालेली.

हजरत निजामुद्दीन स्टेशन; दिल्लीतले मोठे रेल्वे-स्टेशन, सहा-सात नंबरचा प्लॅटफॉर्म. प्लॅटफॉर्म प्रमाणेच, पादचारी पुलावरून प्लॅटफॉर्मकडे येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची नेहमीप्रमाणेच भरपूर गर्दी. आणि अशा गर्दीतून दोन्ही हाताने गर्दीला बाजूला ढकलत अडतीस-चाळीस वर्षाचा एक इसम जिन्यावरून जोरात पळत प्लॅटफॉर्मकडे येत होता. प्लॅटफॉर्मवर उभ्या असणाऱ्या लोकांना तो धडकणार म्हणून सर्वजण घाबरून त्याच्याकडे बघत होते. तरीही तो कोणाकडेही लक्ष न देता पळत खाली आला आणि त्याच्याकडे बघणाऱ्या काही लोकांसमोर गप्पकन उभा राहीला. दोन्ही हाताच्या मुठी आवळून, उजवा हात आणि पाय मागे घेवून डावा हात पाय पुढे करून बॉक्सिंगच्या पोजमध्ये रागाने,"हा - - - -", करून सर्वांकडे बघत उभा राहिला.

'आता हा कोणाचे तरी तोंड फोडणार', असे वाटून सर्वजण त्याच्यापासून घाबरून आठ-दहा पावले मागे सरकले.

सर्वांना घाबरलेले बघताच त्याने खिशातून बंदूक काढायचा हावभाव करत दोन्ही हातांची मुठ एकत्र करून दोन बोटे बाहेर काढून बंदुकीसारखा आकार केला आणि सर्वांच्यावर रोखून धरली आणि तोंडाने”ठो- - ठो- -”असा आवाज काढू लागला. आपल्या हाताच्या नकली बंदुकीने तो येणाऱ्या ट्रेनवर पण फायरिंग करू लागला. फायरिंग करून शांत झाल्यावर तो हसू लागला.

“हा हा हा - - -!, सब बरबाद हो गया, आयदर बिलिव ऑर डोन्ट बिलिव, मुझे बरबाद करनेवालो, खतम. अब भूगतो, आता भोगा सगळेजण !”असे म्हणत जोरजोरात हसू लागला.

हसता हसता मधेच,”बरबाद हो गया, सब बरबाद हो गया !”म्हणत रडू लागला.

आणि रडता रडता”डरनेका नै, घाबरायचं नै, डोन्ट बी स्केअर, नै - - - रडायचं नै !”असे म्हणत जवळच्याच नळावर तोंड धुवू लागला.

“नो, नेव्हर, अजिबात नाही, आपण प्रोफेसर, असं गुन्हेगारी करायचं नाही, आपले गुरु काय म्हणतील, आर्यभट्ट, रामानुजन, न्युटन, पायथागोरस काय म्हणतील !”, असे म्हणत खिशातून मळका रुमाल काढून त्याने तोंड पुसून, तोच रुमाल दोन्ही हाताने झटकून, त्याची लांब घडी करून तो मानेच्या आणि कॉलरच्या मध्ये ठेवून जिन्याशेजारी जावून बसला.

काहीवेळाने,”कामाला लागलं पाहिजे बाबा - - -!”असे म्हणत जिन्याखाली ठेवलेल्या मळक्या पोतडीतून एक पाण्याची बाटली काढून, नळातून

पाणी आणून प्याला. ही सगळी करमणूक बघणारे लोक आपापल्या मार्गी लागत होते. आणि तो जसंकाही काहीच घडले नसल्यासारखे, पोतडीतून चष्मा काढून आपल्या डोळयावर लावून काही कागद काढून एखाद्या अभ्यासकासारखा, विचारवंताच्या अविर्भावात वाचत बसला.

*****

सकाळी साडेदहा-अकराची वेळ, बी. एस्सी. फस्ट इअरचा क्लास, क्लासचा पहिलाच दिवस, क्लासमधले सर्व विद्यार्थी देखील नवीनच होते. विद्याधरचापण कॉलेज मधला पहिला दिवस. पूर्ण बाह्यांचा फिकट रंगाचा शर्ट, त्याला शोभेल अशी ट्राउजर, डोळयावर बारीक काड्यांचा चष्मा, एकंदर टापटीप आलेल्या विद्याधरचा पहिलाच दिवस, पण प्रोफेसर म्हणून.

तो जेंव्हा क्लासमध्ये आला तेव्हा कुणाला कळलेच नाही की हा प्रोफेसर असेल म्हणून, कारण दिसायला विद्यार्थीच वाटत होता. 'हा कोण नवीन पोऱ्या' असे म्हणून काही मुलांनी त्याची टवाळी केली. त्याला पण हे सर्व अपेक्षित होते; तरीपण शांतपणे सगळयांच्यावर एक नजर फिरवत, मंद गोड हसू चेहऱ्यावर आणून त्याने आपली ओळख करून दिली. सर्व विद्यार्थ्यांची नावे विचारून त्याने लेक्चरला सुरुवात केली. पण जेव्हा त्याने शिकवायला सुरुवात केली तेव्हा सर्व मुले मंत्रमुग्ध होवून त्याचे लेक्चर ऐकत होती. बघता बघता लेक्चर कधी संपले कळलेच नाही. तो शांत पणे सर्वांच्याकडे बघून पुन्हा एकदा हसला आणि ‘ओके, उद्या भेटू’, असे म्हणून डिपार्टमेंट ऑफ फिजिक्सच्या स्टाफरूम मध्ये निघून गेला.

असेच दिवस सरत गेले, तो विद्यार्थ्यांचा एक आवडता प्रोफेसर म्हणून ओळखला जावू लागला. लेक्चर संपले तरी मुले त्याच्या मागे स्टाफ रूमपर्यंत येत आणि त्याच्याशी चर्चा करत असत. आणि तो पण त्यांच्या शंका चेहऱ्यावरच्या मंद हास्याने, अगदी सहजपणे निरसन करत असे. त्या मुलांच्यातच ती पण होती. विद्याधर सरांच्यावर ती तर फारच इम्प्रेस झाली होती. अवघड असणारा विषय कसा सोपा करून सांगावा हे त्याला परफेक्ट माहित होते, आणि फिजिक्सच नव्हे गणितात पण त्याचा चांगलाच अभ्यास होता. पण त्याची मास्टरी फिजिक्स मधेच झाली असल्यामुळे तो दुसरा विषय शिकवू शकत नसे. पण कोणी शंका घेवून आले तर जरूर त्यांचे निरसन करून द्यायचा, अर्थातच नेहमीसारखे मंद आणि गोड हसून.

वडिलांचे अकाली निधन झाल्यामुळे आई आणि त्याच्या मोठ्या भावावर कुटुंबाची जबाबदारी आली होती. तीन भाऊ आणि तीन बहिणी अशा सहा भावंडांत तो सर्वात लहान, अन लाडका पण. तिन्ही बहिणींच्या लग्नानंतर, मोठ्या भावाने आणि वहिनीने जणू याला भरपूर शिकवून मोठे करायचा पणच उचलला होता. दुसरा भाऊ परिस्थितीमुळे कमी शिकला होता. गावातच शेती करत, शिकवण्या घेत, तो मोठ्याच्या कष्टाला हातभार लावत होता, अगदी रामायणातल्या लक्ष्मणाप्रमाणे. लहानपणापासून त्यांच्या कष्टाची जाणीव असलेला विद्याधर पण शेतीची कामे करत करत मन लावून शिकत होता. बघता बघता त्याने मास्टर्स डिग्री पूर्ण करून नोकरीला पण लागला प्रोफेसर म्हणून, एका मोठ्या शहरातल्या नामांकित कॉलेजमध्ये.

प्रोफेसर झाला असला तरी तो आठवड्याच्या सुटीला घरी आला असता शेतात कामे करून आपल्या दोन्ही भावांना मदत करायचा, दोन्ही मोठ्यांच्या मनाविरुद्ध.

शांत आणि मनमिळावू, कुणाच्याही अध्यात-मध्यात न पडता आपले काम करणाऱ्या नावाप्रमाणेच विद्यावान असणाऱ्या विद्याधर सरांची कॉलेजची तीन-चार वर्षे कशी गेली कळले पण नाही. घरची परिस्थिती बऱ्यापैकी सुधारू लागली. पूर्वीपासून प्रामाणिक आणि मेहनती म्हणून ओळख असणाऱ्या त्याच्या घराकडे गावचे लोक त्यासोबतच एक वजनदार आणि सुशिक्षित घर म्हणून पण बघू लागले.

म्हणतात ना, घरातला एक माणूस शिकला की अख्खे घर सुधारते, आणि एक घर सुधारले की अख्खे गाव सुधारू लागते, त्याप्रमाणे त्याच्या गावातली मुले देखील त्याच्यासारखी स्वप्ने बघून त्यामागे धावण्याचा प्रयत्न करू लागले. भावाला लग्नासाठी मुली सांगून येवू लागल्या, जवळच्याच गावात राहणाऱ्या एका सधन कुटुंबातल्या मुलीशी भावाचे लग्न ठरले.

पण आपण विचार करत असतो एक, आणि नियतीच्या मनात काही दुसरंच चाललेलं असतं, जे विधीलिखित असत तेच !!!

दुपारी दोन-तीनची वेळ, विद्याधरला शोधत एक पोलिस जीप गावात आली. कॉलेजला पंधरा-वीस दिवस सुट्टी असल्याने तो आपल्या घरी आला होता. नेहमीप्रमाणे घरच्यांशी बोलणं, गावातल्यांशी भेटून गप्पा मारणं, शेतातील कामे

करणं आणि गावातल्या मुलांना अभ्यासातल्या शंका समजावून सांगणं, हे चाललं होतं.

पोलिसांनी त्याच्या घरी चौकशी केल्यानंतर तो सुटीतल्या त्याच्या रोजच्या रुटीनप्रमाणे शेतात काम करत असल्याचे समजले. कुणालाही काहीही कळायच्या आत शेतात जावून त्याला पोलिसांनी जीपमध्ये घालून नेले, जेथे तो नोकरी करायचा त्या शहरात. गावच्यांना-घरच्यांना अचानक हा काय प्रकार घडतोय समजतच नव्हते. त्यामुळे त्याचे भाऊ, आई आणि गावातले बरेच लोक पोलिस स्टेशनला जावून भेटले, तर त्यांना त्याला भेटू दिले नाही, कोणीही दाद दिली नाही, उलट यांनाच आत घालण्याची भीती घालून हाकलून काढले.

त्याची भेटच होवू न दिल्यामुळे हताशपणे गावी परत आलेल्या त्याच्या घरच्यांना आणि गावकऱ्यांना वाट बघत बसण्याशिवाय पर्यायाच नव्हता.

बरीच चौकशी केल्यानंतर 'कुणातरी पोरीच्या भानगडीत विद्या अडकलाय !' अशा बातम्या गावात पसरल्या, आणि होणाऱ्या चर्चा ऐकून घरच्यांना धक्काच बसला. घरच्यांसमोर सगळं काही खुलेपणाने सांगणारा विद्या याविषयी काहीच कसे बोलला नाही हेच घरच्यांना काळत नव्हते, आणि ते देखील इतके गंभीर होईस्तोवर. असे घडणे शक्यच नाही असे घरच्यांना वाटत होते.

पण खरोखरच, एका मुलीला फसवून तिला आत्महत्त्येला प्रवृत्त केल्याचा त्याच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आला होता. पोलिस कस्टडीत दिवस काढत

असलेल्या विद्याधरला विचार करून करून थकला तरीही लक्षात येत नव्हते 'ती कोण आहे जिला माझ्यामुळे आत्महत्त्या करावी लागली आणि मी हे भोगतोय '.

रात्री अकरा-साडेअकराची वेळ, कस्टडीत विचार करून थकलेला आणि रडून रडून अश्रू वाळलेला विद्याधर जमिनीवर हाताची उशी करून नुकताच झोपला होता. इतक्यात नशेत असणाऱ्या पोलिसांसोबत आलेल्या एका माणसाने रागाने शिव्या घालत विद्याच्या पाठीत लाथ घातली,"माझ्या लेकीला मारून तुमच्या म्होरं कसा आरामात झोपलाय बघा ह्यो मास्तर."

अचानक झालेल्या हल्ल्यामुळे तो कळवळून ओरडत उठला. त्या माणसाचा हा अवतार पहिल्यांदाच बघून सोबत असणारे पोलिस घाबरले होते, पण फक्त बघत होते. तशाही परिस्थितीत त्या माणसाला कुठेतरी पहिल्यासारखे विद्याला वाटले, आणि त्याच्याकडे बघत तो हात जोडत आठवू लागला. तर त्याचे जोडलेले दोन्ही हात धरून जोरात उठवत, डाव्या हाताने त्याचे केस पकडून उजव्या हाताने त्याच्या थोबाडीत शिव्या घालत मारू लागला; आणि,"याला असा मारा, असा मारा, मागची चामडी सोलली पायजेल, बसताना-उठताना माझ्या पोरीचा चेहरा आठवायला पायजेल ह्याला, तुमाला दारू-पैसा, कशाची कमी पडणार न्हाई, पण याला सोडू नका, नायतर माझ्याशी गाठ हाय, माज्या पोरीला नादाला लावतोस काय, तुझं लाईफच बरबाद करतो?"असे म्हणत एका पोलिसाच्या हातातली काठी घेवून निमुटपणे सहन करणाऱ्या त्याच्यावर प्रहार करू लागला.

सकाळी साडेनऊची वेळ, रात्रीच्या प्रसंगामुळे दुखऱ्या अंगाने निष्प्राण होवून तो पडून होता. साहेब यायची वेळ झाल्यामुळे पोलिसाने त्याच्या तळपायावर जोरात काठीने मारून त्याला उठवले. उठवत नसले तरी, नाईलाजाने उठून बसायचा प्रयत्न केला पण बसता आले नाही, म्हणून दुखणाऱ्या पायांवर उभा राहिला असह्य वेदना सहन करत. इतक्यात स्टेशन प्रमुख आले, त्यांच्या सोबत कॉलेजचे प्रिन्सीपल आलेले बघून त्याला हायसे वाटले.

त्याच्याकडे बघत स्टेशन प्रमुख,"काय झाले यांना, असे काय झालेत प्रोफेसर, एकदमच गळपटलेत?"

"काही नाही साहेब बरा आहे की हा", ड्युटीवर असणारा पोलिस,"साहेब रात्री अण्णा आले होते."

"मग झाली का भेट प्रोफेसरांची, झाले अण्णा शांत?"स्टेशन प्रमुख.

"हो - - नाही साहेब, दोन दिवसांनी परत येतो म्हणाले, बारावं-तेरावं संपल्यावर"- पोलिस.

"काय प्रोफेसर विद्याधर काय करून ठेवलंय, लफडी करताना कुणाची कन्या आहे हे तर बघायचं ना? सर सांगा तुम्हीतरी."स्टेशन प्रमुख प्रिन्सीपलकडे बघत म्हणाले.

"अण्णा भेटले का काल?" प्रिन्सीपलनी विचारताच त्याने फक्त मान हलवली.

"ओळखले का त्यांना? दोन वर्षापूर्वी स्वत:च्या हस्ते पुरस्कार दिला होता त्यांनी तुम्हाला, आदर्श प्रोफेसर म्हणून. अगदी सज्जन आणि थोर समाजसेवक आहेत ते आपल्या भागातले, त्यांना प्रेमाने आम्ही सगळेजण अण्णा म्हणतो."असे म्हणताच त्याला आठवले, 'पण त्यावेळी ते किती साधे होते, किती आदर्श आणि पूजनीय वाटले होते. ' असा विचार करत असतानाच,

"मी त्यांच्या सांगण्यावरून तुम्हाला त्यांच्या मुलीविषयी लग्नाबद्दल विचारलो होतो, आठवते का सर? पाहिल्यापासून तुमच्यावर फिदा होती म्हणे पोरगी; पण तुम्हाला भावाचे लग्न, पीएचडी करायचे होते ना. त्यावेळी तुम्हाला बोललो नाही, पण तुमच्याच क्लासमध्ये होती ती, तुम्हीच शिकवलेत तिला तीन वर्षे. तुम्ही नाही म्हटल्यामुळे, तिचे लग्न ठरले, मागच्याच आठवड्यात होते. पण तुमच्यावर प्रेम करणाऱ्या पोरीने लग्नादिवशीच आत्महत्त्या केली. चीट्टीत तुमच्यावर प्रेम व्यक्त केलंय पोरीने."

तो विचार करू लागला आणि सरांना सांगण्याचा प्रयत्न करू लागला, "सर गेल्या चार वर्षात मी जेवढ्या मुलांना शिकवत होतो त्यात अण्णांची मुलगी कोण आहे, हेच मला माहित नव्हते. तर माझा काय दोष आहे?"

"मग मी तरी काय करणार, मी जेंव्हा विचारले तेंव्हा सिरिअस नाही घेतलेत, अहो निदान त्या अण्णांकडे तरी बघायचे, आणि त्यांच्याशी वैर केलंत

तुम्ही म्हणून आता भोगा मरेस्तोवर. आता तुम्हाला पण हाकलावे लागेल आमच्या कॉलेजमधून, अण्णांचाच आदेश आहे तसा." असे प्रिन्सिपल म्हणताच, त्याच्या शरीरावर बसलेल्या घावासोबातच मनावर पण घाव बसू लागले.

म्हणतात ना, घरातला एक माणूस बिघडला कि अख्खे घर बदनाम होते, आणि घर बदनाम झाले कि त्यांना गावातले कोणीही काहीही बोलू लगतात. मुलीना फसवणे, आत्महत्त्येला प्रवृत्त करणे, पोलिसांना मारणे असे अनेक गुन्हे त्याच्यावर सिद्ध झाले आणि त्याला दहा वर्षाची शिक्षा झाली. घरातल्यांना बाहेर तोंड दाखवणेदेखील मुश्किल झाले. मधल्या काळात घरचे त्याला एकदाच भेटू शकले होते. जेंव्हा झालेल्या बदनामीमुळे ठरलेले लग्न मोडले म्हणून, स्वत:चा अंत करून घेतलेल्या भावाच्या अन्त्यसंस्काराला आला होता तेंव्हा.

सकाळी साडेदहा-अकराची वेळ, जेलरनी त्याचे अभिनंदन करून आज त्याची शिक्षा पूर्ण झाल्याचे त्याला सांगितले आणि दोन तासांनी तयार होवून येण्यास सांगितले. दोन-अडीच तासांनी तो आपले साहित्य घेवून, सर्वांचा निरोप घेवून निघाला. जेलमध्ये राहून गणित विषयात मास्टर्स डिग्री पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन, आणि गुन्हेगारी प्रतिमेमुळे न-मिळालेल्या पीएचडी बद्दल खंत व्यक्त करून जेलरनी, पुन्हा असा गुन्हा न करण्याचा सल्ला देवून त्याला निरोप दिला.

इथे आतमध्ये आल्यानंतर तो दुसऱ्यांदा बाहेर आला होता, चारपाच वर्षापूर्वी आई गेली तेंव्हा आणि आज, परत इथे न येण्यासाठी.

गावातल्या लोकांच्या नजरेला पडू नये म्हणून तो रात्री उशीराच घरी आला, मागच्या दराने आत जावून सोबत कपड्यात बांधलेला पुस्तकं-कागदांचा गठ्ठा बाजूला ठेवून मोठ्या भावाला आणि भावाच्या दोन्ही मुलांना घट्ट धरून मनसोक्त रडला. रात्रभर भाऊ-वहिनीशेजारी बसून जेलमध्ये लिहिलेले लेख, प्रबंध, शोध-निबंध दाखविले. त्यांना काही कळले नसले तरी ते कौतुकाने बघितले.

रात्री एक-दीडची वेळ. अंगावर चांगले कपडे घातले. आधीच तयार करून ठेवलेली पुस्तकं-कागदपत्रांची पोतडी घेवून झोपलेल्या भावा-वहिनीला त्यांच्या नकळत नमस्कार करून निघाला. इथे येवून दीड-दोन महिने झाले होते, नाही म्हणता-म्हणता गावातल्या सगळयांना तो आल्याची बातमी कळलीच. दोनतीन दिवसापूर्वी भावाचा मुलगा शाळेतल्या मुलांनी 'भानगडबाज काकाचा पुतण्या' म्हणून चिडवल्याने शाळेतून रडत आलेला पाहून त्याला धक्काच बसला. याविषयी भाऊ-वहिनीशी बोलल्यावर त्यांनी,"तू आमच्या नजरेत कितीही निर्दोष असलास तरी कायद्यासमोर, घटनेसमोर गुन्हेगारच आहेस, समाज कायम तुला त्याच नजरेने बघणार विद्या, त्याला आमचा नाईलाज आहे बाळा,"असे रडत रडत सांगितल्यावर

त्याने हा निर्णय घेतला. आपली जुनी ओळख पुसण्यासाठी आपली सारी प्रशस्तिपत्रे, ओळखपत्रे जाणून-बुजून घरीच ठेवून तो मध्यरात्रीच निघाला नवी पहाट उगवेल या आशेने !

सकाळी साडेआठ-नऊची वेळ. कोल्हापूर रेल्वे स्टेशन. आठवड्यातून एकदा निघणारी दिल्लीची ट्रेन थांबली होती, लोकांची नजर चुकवत तिकीट घेवून तो ट्रेनमध्ये बसला. जेलर सरांनी सांगितल्यानुसार दिल्लीत अंतर-राष्ट्रीय विज्ञान विभागाकडे स्वत: संशोधन करून लिहिलेले लेख आणि निबंध पटवून देण्यासाठी तो निघाला होता, जेणेकरून जगभरातल्या विद्यार्थ्यांना ते उपयोगी होतील. ट्रेनमधून उतरल्यानंतर पोतडी पाठीवर घेवून चालतच तो विभागाच्या भल्या मोठ्या गेट मध्ये पोहोचला. त्याचा अवतार पाहून तेथील रक्षकांनी त्याला हसून वेडा समजून हाकलून काढला, तो जीवाच्या आकांताने विनवण्या करत होता तरीही. तो फारच त्रास देतोय असे पाहून त्यातल्या दोनतीन धिप्पाड रक्षकांनी त्याला लाथा-बुक्क्यांनी इतका मारला कि त्याला स्वत:लाच आपण वेडा असल्याची खात्री पटली.

आणि तो ती पोतडी पाठीवर टाकून चालू लागला परतीच्या दिशेने, आपण आपले शोध, आपले लेख सगळे काही बरबाद झाल्याची खंत मनात ठेवून !!!

पण परत कुठे जायचे काहीच कळत नव्हते. आपल्या बरबादीचे ओझे पाठीवर टाकून चालला होता. समोर दिसणाऱ्या समाजावर रागाने होणारी तडफड मनातल्या मनात दाबत चालला होता.

फक्त चालला होता !!!

*****

सकाळी नऊ-साडेनऊची वेळ, जुलै महिना, नुकताच जोरात पाऊस पडून गेला होता. हजरत निजामुद्दीन स्टेशन; दिल्लीतले मोठे रेल्वेस्टेशन, सहा-सात नंबरचा प्लॅटफॉर्म. प्लॅटफॉर्म प्रमाणेच, पादचारी पुलावरून प्लॅटफॉर्मकडे येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची नेहमीप्रमाणेच भरपूर गर्दी. आणि नेहमीप्रमाणेच अशा गर्दीतून दोन्ही हाताने गर्दीला बाजूला ढकलत अडतीस-चाळीस वर्षाचा तो इसम जिन्यावरून जोरात पळत प्लॅटफॉर्मकडे येत होता. प्लॅटफॉर्मवर उभ्या असणाऱ्या लोकांना तो धडकणार म्हणून सर्वजण घाबरून त्याच्याकडे बघत होते. सर्वांना घाबरलेले बघून पळता-पळता त्याने खिशातून बंदूक काढायचा हावभाव करत दोन्ही हातांची मुठ एकत्र करून दोन बोटे बाहेर काढून बंदुकीसारखा आकार केला.

आणि”ठो- - - ठो - - -!!!”आवाज करत सर्वांच्यावर रोखली असताना,

सर्वांच्याच काळजाचा ठोका चुकला. पावसाने भिजलेल्या त्या प्लॅटफॉर्मवर त्याचा पाय घसरला, आणि स्वत:ला सावरण्याआधीच तो पडला. निसरड्या झालेल्या प्लॅटफॉर्म वरून तो घसरत रेल्वे रुळावर जावून पडला. आणि त्याचे दुर्दैव म्हणावे कि सुदैव त्याच वेळी त्या रुळावरून एक ट्रेन जात होती. कोणी किंचाळले, कोणी ओरडले, कोणी त्याला धरण्यासाठी धावले, तर काही जण बेहोष झाले. पापणी लवते न लवते तोच हा भयानक प्रसंग घडला, सर्वजण जागेवरच स्तब्ध झाले, काहीच क्षणाच्या भयाण शांततेनंतर अचानक लोकांचा कोलाहल सुरु झाला.

पण सगळयांच्या वर फायरिंग करत-करत, तो मात्र शांत झाला !!

- - - - - कायमचा !!

पोलिसांनी त्वरित प्लॅटफॉर्मचा ताबा घेतला, प्लॅटफॉर्मला आणि रुळाला आडोसा करण्यात आला. तेथील येणाऱ्या ट्रेन दुसऱ्या प्लॅटफॉर्म वरून सोडण्यात आल्या. पोलिसी सोपस्कर पूर्ण करण्यात आले, आणि त्याचा देह अम्ब्युलन्स मधून नेवून सरकार दफ्तरी,

'एक अनाथ, अनामिक, वेडपट भिकारी - - - - - अपघाती मृत्यू !',

म्हणून नोंदवून अंतिम संस्कार करण्यात आला.

तो बसत असलेल्या, जिन्याच्या खालच्या बाजूला असणारी त्याची पोतडी पोलिसांकडून तपासली गेली, प्लास्टिक पेपरमध्ये बांधलेले गणित आणि

फिजिक्स विषयाची बरीच पुस्तके आणि त्याने लिहिलेले बरेच शोध-निबंध; लेख, पेन पेन्सील, चष्मा असे साहित्य त्यातून निघाले. ती पुस्तके, त्याने लिहिलेले लेख, प्रबंध सरकारकडे जमा करण्यात आले.

आणि सखोल अभ्यासानंतर, शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने आणि सरकारतर्फे काही विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमासाठी, अंतरराष्ट्रीय गणित आणि विज्ञान महामंडळाकडे त्या अनामीकाचे लेख, शोधनिबंध आणि प्रबंध जमा करण्यात आले;

जेथे तो स्वतः गेला होता, हेच पटवून देण्यासाठी आणि जमा करण्यासाठी - - - - !!!

जिथे असेल तिथून तो जणू म्हणत होता,

“भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले l

एवढे मी भोगिले की मज हसावे लागले ll”

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.